# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक २३ मार्च, २०२३**

## अल्पसंख्याक विकास विभाग

## कपात सूचनांची एकूण संख्या - ४२

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: झेडई-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण**<br>**रूपये:- ८,३८,४०,५७,०००/-**<br>**श्री. शिरीष चौधरी** |
| (१) | ५९०४ | १० | जळगांव जिल्हयातील रावेर मतदार संघात अल्पसंख्याक विकासाअंतर्गत अनेक कामे प्रलंबित असुन यामध्ये मौजे विवरे बु, मौजे विविरे खु , मोजे खिरवड , मौजे रसलपुर , मौजे, कर्जोद , मौजे खानापूर , मौजे, निभोंरा, मौजे हिंगोणा, मोजे मारुळ, मौजे बामणोल, मौजे न्हावी या ठिकाणी शादीखाना हॉलचे बांधकाम आवश्यक असुन यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची नितांत आवश्यकता व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | ५९०६ | १० | जळगांव जिल्हयातील रावेर मतदार संघात अल्पसंख्याक विकासा अंतर्गत मौजे रसलपुर ,मौजे पाल, मौजे चिनावल या ठिकाणी रस्त्याच्या कॉंक्रीटीकरणाची कामे व रावेर येथील गट नं.१२८० मध्ये कब्रस्थानकडे जाणा-या पुलाचे बांधकाम करणे अत्यंत आवश्यक असुन यासाठी निधी उपलबध करुन देण्याची नितांत आवश्यकता व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३) | ५९०८ | १० | जळगांव जिल्हयातील रावेर मतदार संघातील यावल तालुक्यात अल्पसंख्याक विकासाअंतर्गत अनेक कामे प्रलंबित असुन यामध्ये मौजे हिंगोणा, मोजे मारुळ, मौजे बामणोल, मौजे न्हावी या ठिकाणी शादीखाना हॉलचे बांधकाम आवश्यक असुन यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची नितांत आवश्यकता व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. धिरज देशमुख** |
| (४) | ५७९८ | १० | दिंडेगाव ता.लातूर येथे कब्रस्थानास संरक्षण भिंत बांधणे आवश्यक असणे. नागरिकांची गैरसोय होत असणे. सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | ५८०० | १० | वांजरखेडा ता. लातूर येथे मुस्लीम समाजचे कब्रस्थानास संरक्षण भिंत बांधणे आवश्यक असणे. नागरिकांची गैरसोय होत असणे. सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | ५८०१ | १० | वाघोली भिसे ता.लातूर येथे अल्पसंख्यांक समाजासाठी शादीखाना बांधणेआवश्यक असणे. नागरिकांची गैरसोय होत असणे. सदर कामांसाठी निधीची |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | ५८०२ | १० | उटी बु. ता.औसा येथे अश्रुफखाना बांधकाम करणे आवश्यक असणे. नागरिकांची गैरसोय होत असणे. सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | ५८०३ | १० | शिवली ता.औसा येथे अल्पसंख्यांक समाजासाठी शादीखाना बांधणे करणे आवश्यक असणे. नागरिकांची गैरसोय होत असणे. सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | ५८०५ | १० | फरदपूर ता.रेणापूर येथे अल्पसंख्यांक वस्तीत सिमेंट रोड व नाली बांधकाम करणे आवश्यक असणे. नागरिकांची गैरसोय होत असणे. सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | ५८०६ | १० | कारेपुर ता.रेणापूर येथे अल्पसंख्यांक वस्तीत सिमेंट रोड व नाली बांधकाम करणे आवश्यक असणे. नागरिकांची गैरसोय होत असणे. सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (११) | ५८०७ | १० | बोरगाव बु. ता.लातूर येथे अल्पसंख्यांक समाजासाठी शादीखाना बांधणे आवश्यक असणे. नागरिकांची गैरसोय होत असणे. सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१२) | ५८०८ | १० | भातांगळी ता.लातूर येथे अल्पसंख्यांक समाजासाठी शादीखाना बांधकाम करणे आवश्यक असणे. नागरिकांची गैरसोय होत असणे. सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अमिन पटेल** |
| (१३) | ५७८९ | १० | राज्यातील सरकारने अल्पसंख्याक समाजाला ५ टक्के आरक्षण दिले असणे, या निर्णयावर स्वतंत्र अध्यादेश निघणे, अल्पसंख्याक समाजाचे आर्थिक मागासलेपण दूर करण्यासाठी विविध योजना तयार करणे, अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणाकरिता शिष्यवृत्तीची तरतूद करणे, महिला सक्षमीकरण करण्याच्या उद्देशाने अल्पसंख्याक समाजातील महिलांना आरक्षण देणे, या आणि अश्या प्रकारच्या मागण्या अनेक वर्षापासून प्रलंबित असणे, परिणामी अल्पसंख्याक समाजातील नागरिकांमध्ये नाराजीची भावना असणे, त्यामुळे शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१४) | ५७९१ | १० | राज्यातील अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी परदेश पाठविण्याकरीता शिष्यवृत्ती देण्याची मार्च २०११ मधील अर्थसंकल्पीय अधिवेशनात मागणी होणे, त्याच वर्षी पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागणीमध्ये तत्कालीन वित्तमंत्री यांनी याकरिता ५ कोटी रुपये निश्चीत केले जातील असे आश्वासन सभागृहात दिले असणे, परंतू आजमितीपर्यत सदर निधीची तरतूद न होणे, त्यामुळ अल्पसंख्याक समाजातील जनतेमध्ये असंतोष निर्माण होणे, अल्पसंख्याक समाजातील हुशार विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी सदर निधीची तरतूद होणे अत्यंत गरजेचे असणे, तरी अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना १० कोटी रुपये उच्च |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | शिक्षणासाठी परदेशी पाठविण्याकरीता शिष्यवृत्ती देण्यात यावी अशी मागणी असणे, त्यामुळे शासनाने यावर तातडीची करावयाची कारवाई व शासनाची उपाययोजना. |
| (१५) | ५८०४ | १० | मुंबई येथील डोंगरी विभागात एम इ. सारंग मार्गावर पीर सय्यद हाजी अब्दुल रेहमान शाह बाबा आयटी आय कॉलेजचे बांधकाम प्रस्तावित असणे, मागील ब-याच काळापासून या कॉलेजचे बांधकाम संथगतीने सुरु असणे, अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्याबरोगरच इतर तुलांना आयटीआय कॉलेजमध्ये शिक्षण घेता यावे म्हणुन या कॉलेजची निर्मिती करण्यात येणे, परंतू बांधकामास होत असलेलया दिरंगाईमुळे तसेच या कॉलेजची इमारतींमध्ये अपु-या सोयी सुविधा असल्यामुळे आजमितीपर्यंत कॉलेजच सुरु न होणे यावर शासनाने करावयाची कार्यवाही तातडीची कार्यवाही व शासनाची उपाययोजना. |
| | | | **श्री. अजित पवार** |
| (१६) | ५८२७ | १० | राज्यात अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी असलेली प्री मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना बंद करण्यात आली असणे, राज्यात अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकडून प्री मॅट्रिक शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरून प्रमाणित केल्यावर सदर अर्ज फेटाळण्याच्या सूचना शिक्षण संचालक (योजना) यांनी दिले असल्याचे माहे डिसेंबर,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असणे, पहिली ते दहावी पर्यंतच्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना दरवर्षी मिळणारी प्री मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळणे बंद असल्याने विद्यार्थी आणि पालकांची आर्थिक अडचण निर्माण झाल्याने अनेक शैक्षणिक समस्या उद्भवल्याचे असणे,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्री मॅट्रिक शिष्यवृत्ती अदा करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही. |
| (१७) | ५८२८ | १० | राज्यातील बहुतांशी शहरात विशेषतः येवला (जि.नाशिक) नगरपरिषद क्षेत्रातील अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्र विकास कार्यक्रम राबविण्यासाठी मंजूर असलेली कामे पूर्ण झाल्यामुळे या कामांचे देय व प्रलंबित असलेले अनुदान मिळणेसाठी स्थानिक लोकप्रतिनिधी शासनाकडे मागणी केलेली असणे, जिल्हाधिकारी नाशिक यांनी दि. २६ जुलै २०२१ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेल्या २८ कामांसाठी रु. ४३६.५३ लक्ष निधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकारी नाशिक यांनी प्रधान सचिव,अल्पसंख्यांक कल्याण विभाग यांचेकडे दिनांक २८ सप्टेंबर २०२२ रोजी प्रस्ताव दाखल करून निधीची मागणी केलेली असणे, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी करण्याची आवश्यकता, येवला (जि.नाशिक) नगरपरिषद क्षेत्रातील अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्र विकास कार्यक्रम राबविण्यासाठी मंजूर असलेल्या कामांसाठी जिल्हाधिकारी, यांना निधी देण्याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१८) | ५८३१ | १० | महाराष्ट्र शासनाने अल्पसंख्यांक समाजाचा आर्थिक शैक्षणिक व सामाजिक स्तर उंचावण्याचे उद्देशाने सन २००२ साली अल्पसंख्यांक विकास विभागांतर्गत मौलाना आझाद अल्पसंख्यांक विकास महामंडळाची स्थापना केली असणे, महामंडळ स्थापनेला २१ वर्षे पूर्ण होऊन ५०० कोटीचे भाग भांडवल असणाऱ्या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | महामंडळाचे कामकाज कंत्राटी कर्मचाऱ्यांवर अवलंबून असून आजतागायत एकही कर्मचारी नियमित करण्यात आला नसल्याचे तसेच महामंडळासाठी शासनाने (वित्त विभाग) ७५ पदे मंजूर केली असतांना फक्त ५० कर्मचारी संख्या असून कंत्राटी स्वरुपात असल्याचे निदर्शनास आले असणे, महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये निवृत्त होऊनही त्यांचे जागी नवीन व्यवस्थापकीय संचालकाची नियुक्ती करण्यात आली नसणे, सन २०१५ नंतर महामंडळाने व्यवसाय कर्ज देखील सुरु केले नसून शैक्षणिक कर्ज मर्यादा १५ ते २० लाखापर्यंत करण्याबाबत विविध मागण्यांबाबतचे निवेदन अल्पसंख्याक समाज नागरीक करीत असताना शासनाचे झालेले दुर्लक्ष याबाबतीत शासनाने करावयाची कार्यवाही. |
| (१९) | ५८३३ | १० | केंद्र सरकाने अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी असलेली मौलाना आझाद फेलोशिप ही योजना बंद केली असल्याचे माहे जानेवारी. २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास असणे, तसेच प्री-मॅट्रीक शिष्यवृत्तीही इयत्ता ९ व १० वी पुरतीच मर्यादित केली असल्यामुळे राज्यातील अल्पसंख्यांक समुदायाच्या मनात शासनाविषयी पसरलेला असंतोष, सदरील योजना पुन्हा सुरु ठेवण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२०) | ५८३४ | १० | राज्यात मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाकडून अल्पसंख्यांक बेरोजगारांना ३० लाख पर्यंत कर्ज देणेबाबत कर्ज वितरक बँकांकडून टाळाटाळ करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असणे, सदर योजने अंतर्गत राज्यातील अल्पसंख्यांक बेरोजगारांना कर्ज उपलब्ध करून देण्यात आले नसल्यामुळे राज्यातील अल्पसंख्यांक समुदायाच्या मनात शासनाविषयी पसरलेला असंतोष, सदरील योजना पुन्हा सुरु ठेवण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२१) | ५८३६ | १० | राज्यातील अल्पसंख्यांक भागात विशेषतः चोपडा तालुक्यात (जि.चळगांव) अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी इमारतीचे बांधकामाच्या प्रस्तावास अल्पसंख्यांक विकास विभागाने मंजूरी दिली असणे,सदर संस्थेच्या इमारतीच्या बांधकामासाठी चोपडा शहरातील गट क्र.२८८ ही जागा माहे मार्च, २०१८ मध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्यांनी असूनही शासनाकडून अद्याप उक्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला नसल्यामुळे राज्यातील अल्पसंख्यांक समुदायाच्या मनात शासनाविषयी पसरलेला असंतोष, अल्पसंख्यांक औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला तात्काळ निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे लेखी निवेदनाव्दारे वारंवार केलेली असून सदरअल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी इमारतीचे बांधकाम करण्यास निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अनिल पाटील** |
| (२२) | ५८६९ | १०० | जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर येथील अल्पसंख्यांक विभागाकडून मंजूर असलेले शासकीय तंत्रनिकेतन निधी अभावी प्रलंबित असणे तसेच भूसंपादना अभावी अपूर्ण अवस्थेत असलेले बांधकाम तात्काळ भूसंपादन करून निधी उपलब्ध करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२३) | ५८७८ | १०० | जळगाव जिल्ह्यातील अमळनेर विधानसभा मतदारसंघातील अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण क्षेत्रात मूलभूत व पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सन 2021 22 अंतर्गत अनुदान वितरण वितरित करण्यास मंजुरी देण्यात आलेले असणे, परंतु शासनाने परिपत्रक काढून सदर मंजूर कामास त्यागी ती दिलेली असणे सदर स्थगिती उठून निधी पूर्ववत वितरित करणे बाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (२४) | ५७९६ | १० | राज्यातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम राबविण्यासाठी येवला नगरपरिषदेतील कामांना अनुदान वितरीत करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. ०१ फेब्रुवारी २०२३ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली असणे, येवला नगरपरिषदेसाठी राज्यातील अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम राबविण्यासाठी शासन निर्णय क्र.नाक्षेवि-२०१९/प्र.क्र-१७०/का ९ दि.२/१/२०२० अन्वये २८ कामांना मंजुरी दिलेली असणे, त्यानुसार जिल्हाधिकारी,नाशिक यांनी दि.२६/७/२०२१ च्या आदेशानुसार या कामांना प्रशासकीय मान्यता दिलेली असणे, ही कामे पूर्णत्वाच्या मार्गावर असून या कामांसाठी रु.४३६.५३ लक्ष निधी मिळणेसाठी कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम पूर्व विभाग नाशिक यांनी मागणी केलेली असणे, राज्यातील अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम राबविणे या योजनेतून येवला नगरपरिषदेतील पूर्ण झालेल्या कामांसाठी रु.४३६.५३ लक्ष निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२५) | ५७९७ | १० | राज्य शासनाने इयत्ता १ ली ते १० वी.च्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना वारंवार आवाहन करून दहा लाखांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांकडून प्री-मॅट्रिक शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरून घेतलेले असणे, मात्र आता शाळांनी ते अर्ज प्रमाणित केल्यावर अचानक शासनाने हे अर्ज फेटाळण्याच्या सूचना दिल्या असणे,त्यामुळे मागील वर्षी शिष्यवृत्ती मिळालेले व यंदा नव्याने अर्ज करणारे विद्यार्थी शिष्यवृत्तीला मुकले असून पालकांमध्ये संताप निर्माण झालेला असणे, पहिली ते दहावीपर्यंतच्या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना प्री-मॅट्रिक स्कॉलरशिप योजनेतून केंद्र सरकारमार्फत दरवर्षी एक हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जात असणे, यंदा नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर अर्ज भरून घेणे व पडताळणी करून केंद्राकडे पाठविण्याची जबाबदारी शिक्षण संचालक (योजना) कार्यालयाकडे दिली असणे, सुरुवातीला अत्यल्प अर्ज भरले गेल्याने संचालनालयाने ३१ऑक्टोबरपर्यंत मुदत वाढवून दिलेली असणे, त्यानंतर पुन्हा ५ नोव्हेंबरपर्यंत मुदत वाढविण्यात आलेली असणे, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | मात्र आता विद्यार्थ्यांनी भरलेले अर्ज शाळास्तरावर प्रमाणित झाल्यानंतर नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर अचानक अर्ज रद्द करण्याचे परिपत्रक जारी करण्यात आलेले असणे, या परिपत्रकानुसार पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांना आरटीईनुसार मोफत शिक्षणाचा लाभ दिला जात असणे, त्यामुळे त्यांना प्री-मॅट्रिक शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाऊ शकत नसणे, केवळ नववी आणि दहावीतील विद्यार्थ्यांचेच अर्ज प्रमाणित करून केंद्र शासनाकडे पाठविण्याच्या सूचना करण्यात आलेले असणे, यामुळे महाराष्ट्रातील पहिली ते आठवीचे अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थी शिष्यवृत्तीला मुकलेले असणे,त्यामुळे अल्पसंख्यांक समाजातील नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. |
| (२६) | ५७९९ | १० | राज्यातील अल्पसंख्यांक बहुल खेत्रात मुलभूत/ पायाभुत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अनुदान वितरीत करणे या योजनेतून निफाड आणि येवला (जि.नाशिक) तालुक्यात शासन निर्णय दि. ३१ मार्च २०२२ रोजी मंजुर असलेल्या अनं. ५०५ ते ५३७ या कामांना शासनाने स्थगिती दिलेली असणे, या कामांवरील स्थगिती उठविण्यासाठी जिल्हाधिकारी नाशिक यांनी दि. १६ नोव्हेंबर २०२२ रोजी शासनास प्रस्ताव पाठविलेला असणे, तसेच या कामांची स्थगिती उठवून सदर कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. २० डिसेंबर २०२२ रोजी तसेच अनेकदा मा. मुख्यमंत्री यांचेकडे मागणी केलेली असणे, सदर कामांची स्थगिती उठविण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (२७) | ५८४८ | १० | दर्यापूर मंतदारसघात अल्पसंख्यांक समाजाची मोठ्या प्रमाणात संख्या असणे , शासन निर्णय क्रमांक ग्राक्षेवि -२०२१ /प्र. क्र. ८३/ का-९ दिनांक ३१ मार्च २०२२ नुसार दर्यापूर मतदारसंघातील अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण क्षेत्रात मूलभूत/पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी रु १०० लक्ष रुपयांच्या विकास कामाना प्रशासकीय मान्यता प्राप्त असणे , सदर विकासकामे होणे अत्यंत आवश्यक असणे , परंतु सफडर विकास कामांवर स्थगिती असल्याने सदर कामाची प्रक्रिया रखडली असणे , सदर कामांवरील स्थगिती हटवण्याची नितांत आवश्यकता असणे , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२८) | ५८६४ | १० | राज्यात सर्वांसाठी घरे अंतर्गत केंद्र पुरस्कृत ग्रामीण तसेच शहरी भागात प्रधानमंत्री आवास योजना सुरू असणे , परंतु अल्पसंख्यांक समाजातील लाभार्थीसाठी कोणतीही स्वतंत्र योजना नसणे , प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत अल्पसंख्यांक प्रवर्गातील लाभार्थीचे उद्दिष्ट नसल्याने ग्रामीण तसेच शहरी भागातील अल्पसंख्याक प्रवर्गातील लाभार्थी घरकुलाच्या लाभापासून वंचीत असणे , यामुळे अल्पसंख्याक प्रवर्गातील लाभार्थीमध्ये शासनाप्रती तीव्र असंतोष निर्माण झालेला असणे ,प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत अल्पसंख्यांक प्रवर्गातील लाभार्थीचे उद्दिष्ट निर्माण करण्याच्या नितांत आवश्यकता असणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना , |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (२९) | ५७५९ | १० | महाराष्ट्रात शहरी मुस्लिमांमध्ये द्रारिद्र्य रेषेखालचं प्रमाण ५० टक्क्याहून जास्त असणे,आघाडी सरकाने २०१४ साली मुस्लिमांना ५ टक्के आरक्षण देणे, उच्च न्यायालयाने देखील मुस्लिमांचे शैक्षणिक आरक्षण मान्य करणे, मुस्लिमांना ५ टक्के आरक्षण कोटा न मिळाल्याने निर्माण होणाऱ्या बॅकलॉगचा हिशोब केला तर केंद्रीय नोकरीत ९.३ लाख आणि महाराष्ट्रात ४६,००० जागा मुस्लिमांना मिळायला हव्यात, मुस्लिम समाजाला अर्थिक दृष्टया कमकुवत असलेल्या मुस्लिम समजला नोकरीत प्राधान्य देण्याची नितांत गरज असणे त्यादृष्टीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३०) | ५७६३ | १० | अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता नवीन तंत्रनिकेतन सुरू करण्यासाठी शासनाची योजना असणे, मुंबई उपनगरातील मालाड-पश्चिम, मालवणी येथे मुस्लिम अल्पसंख्यांक समुदायाची फार मोठी लोकसंख्या असणे, या परिसरात शासकीय भूखंड देखील उपलब्ध असणे, तथापि सदर योजना आजपर्यंत या परिसरात न राबवणे, मालवणी येथे सदरची योजना राबवून तंत्रनिकेतन बांधण्याची नितांत आवश्यकता आहे त्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३१) | ५७६४ | १० | अल्पसंख्यांक शाळांना पायाभूत सुविधा पुरविणेकरिता शासनाचा सहायक अनुदान (कार्यक्रम)असणे, मुंबई उपनगरातील मालाड-पश्चिम, मालवणी येथे २० पेक्षा जास्त अल्पसंख्यांक शाळा असणे, मात्र या शाळांमध्ये मलभूत सोयी-सुविधांचा अभाव असणे, तथापि सदर योजना आजपर्यंत या परिसरात न राबवणे, मालवणी येथे सदरची योजना राबवून विद्यार्थ्यांना सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता व दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३२) | ५७६५ | १० | शहरातील अल्पसंख्यांक समाजातील मुलींच्या वसतिगृहाकरिता सहायक अनुदान (कार्यक्रम)असणे, मुंबई उपनगरातील मालाड-पश्चिम, मालवणी येथे अल्पसंख्यांक समुदायाची फार मोठी लोकसंख्या असणे, या परिसरात शासकीय भूखंड देखील उपलब्ध असणे, मुलींसाठी एकही वसतिगृह सदर परिसरात नसणे, मालवणी येथे सदरची योजना राबवून अल्पसंख्यांक मुलींसाठी वसतिगृह बांधण्याची आवश्यकता व त्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३३) | ५७६६ | १० | अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रात क्षेत्रविकास योजनेकरिता सहायक अनुदान (कार्यक्रम)असणे, मुंबई उपनगरातील मालाड-पश्चिम, मालवणी येथे मुस्लिम अल्पसंख्यांक समुदायाची फार मोठी लोकसंख्या असणे, तरी देखील सदर परिसरात ही योजना न राबविणे, मालवणी परिसरात सदर योजना राबविण्याची आवश्यकता व त्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३४) | ५७६७ | १० | उर्दू घर यासाठी सहायक अनुदान (कार्यक्रम) असणे, मुंबई शहरातील माझगाव येथे उर्दू घरासाठी जागा उपलब्ध असणे, अल्पसंख्यांक समुदायासाठी उर्दू घर बांधेणेची आवश्यकता निर्माण झाली असणे, अल्पसंख्याक समुदाय विभागाच्या संबधित अधिकारी या बाबीकडे दुर्लक्ष करीत असणे, परिणामी अल्पसंख्यांक |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | समुदायात निर्माण झालेला तीव्र असंतोष व शासना प्रती निर्माण झालेली चिडीची भावना, सदर योजना राबविण्याची आवश्यकता व त्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३५) | ५७६८ | १० | उर्दू घर यासाठी सहायक अनुदान (कार्यक्रम) असणे, मुंबई उपनगरातील मालाड-पश्चिम, मालवणी येथे उर्दू भाषिक अल्पसंख्यांक समुदायाची फार मोठी लोकसंख्या असणे, तरी देखील सदर परिसरात उर्दू घर बांधण्याची योजना न राबविणे, मालवणी परिसरात सदर उर्दू घर बांधण्याची योजना राबविण्याची आवश्यकता व त्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३६) | ५७६९ | १० | शहरातील अल्पसंख्यांक समाजातील मुलींच्या वसतिगृहाकरिता सहायक अनुदान (कार्यक्रम) असणे, मुंबई उपनगरातील गोवंडी येथे मुस्लिम अल्पसंख्यांक समुदायाची फार मोठी लोकसंख्या असणे, या परिसरात शासकीय भूखंड देखील उपलब्ध असणे, अल्पसंख्यांक मुलींसाठी एकही वसतिगृह सदर परिसरात नसणे, गोवंडी येथे सदरची योजना राबवून अल्पसंख्यांक मुलींसाठी वसतिगृह बांधण्याची आवश्यकता व त्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३७) | ५७७० | १० | अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता नवीन तंत्रनिकेतन सुरू करण्यासाठी शासनाची योजना असणे, ठाणेतील भिवंडी येथे मुस्लिम अल्पसंख्यांक समुदायाची फार मोठी लोकसंख्या असणे, या परिसरात शासकीय भूखंड देखील उपलब्ध असणे, तथापि सदर योजना आजपर्यंत या परिसरात न राबवणे, भिवंडी येथे सदरची योजना राबवून तंत्रनिकेतन बांधण्याची नितांत आवश्यकता आहे त्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३८) | ५७७१ | १० | अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रात क्षेत्रविकास योजनेकरिता सहायक अनुदान (कार्यक्रम) असणे, ठाणेतील मुंब्रा येथे अल्पसंख्यांक समुदायाची फार मोठी लोकसंख्या असणे, तरी देखील सदर परिसरात ही योजना न राबविणे, मुंब्रा परिसरात सदर योजना राबविण्याची आवश्यकता व त्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विक्रमसिंह सावंत** |
| (३९) | ५८८३ | १० | सांगली जिल्हयातील जत तालुक्यात मौजे उमदी, करजगी, बिरुर ,धावडवाडी,संख,बोर्गी खु,गिरगांव, डफळापुर याठिकाणी मुस्लीम समाजाची लोकवस्ती मोठया प्रमाणात असुन या ठिकाणी मुस्लीम समाजासाठी शादीखाना होणे आवश्यक असुन यासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी करावयाची कार्यवाही व यावर करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. झीशान सिद्दिकी** |
| (४०) | ५८४३ | १० | मुंबई मधील बांद्रा पूर्व येथील टिचर कॉलोनी परीसरात असणाऱ्या यु बी एस महाविद्यालय जवळ मुस्लिम समुदायाच्या मृत पावलेल्या नागरीकांचे दफन करण्यासाठी कबरस्तान असणे, या कबरस्तानची दुरावस्था झालेली असणे, या कबरस्तानच्या संरक्षक भिंतीचे देखील नुकसान झालेले असणे, त्यामुळे समाज कंटकांचे या कबरस्तानच्या आवारात वावर वाढणे, परिणामी या परीसरातील |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | नागरिकांना आणि मुस्लिम समुदायातील दफनविधी साठी आलेल्या नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागणे, या कबरस्तानाच्या संरक्षक भिंतीच्या दुरुस्तीची मागणी होणे तसेच सदर कबरस्तानचे बांधकाम पक्के करण्याची विनंती वजा मागणी मुस्लिम समुदायाकडून होणे, शासनाने यावर करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची उपाययोजना. |
| (४१) | ५८४४ | १० | मुंबई मधील बांद्रा पूर्व येथील गोळीबार परीसरात असणाऱ्या मुस्लिम समुदायाच्या मृत पावलेल्या नागरीकांचे दफन करण्यासाठी कबरस्तान असणे, या कबरस्तानची दुरावस्था झालेली असणे, या कबरस्तानच्या संरक्षक भिंतीचे देखील नुकसान झालेले असणे, त्यामुळे समाज कंटकांचे या कबरस्तानच्या आवारात वावर वाढणे, परिणामी या परीसरातील नागरिकांना आणि मुस्लिम समुदायातील दफनविधी साठी आलेल्या नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागणे, या कबरस्तानाच्या संरक्षक भिंतीच्या दुरुस्तीची मागणी होणे तसेच सदर कबरस्तानचे बांधकाम पक्के करण्याची विनंती वजा मागणी मुस्लिम समुदायाकडून होणे, शासनाने यावर करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४२) | ५८४७ | १० | मुंबई मधील बांद्रा पूर्व येथील बेहराम नगर परीसरातील ए. के. मार्गावर नॅशनल गर्ल्स उर्दू हायस्कुल या नावाची शाळा असणे या शाळेची अवस्था खूपच खराब झालेली असणे, या शाळेची इमारत जुनी झाली असणे, या शाळेच्या वर्ग खोल्या व शाळेतील स्वच्छतागृहाची अवस्था खूपच बिकट झाली असणे, या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची व शिकविणाऱ्या शिक्षकांची सुरक्षा लक्षात घेता या शाळेची दुरुस्ती लवकरात लवकर होणे गरजेचे असणे, सदर शाळा अत्याधुनिक सोयी सुविधांसह सज्ज अशी शाळा करण्यात यावी अशी मागणी असणे शासनाने यावर करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २१ मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) अल्पसंख्याक विकास विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई